सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ७ मधील तरतुदीनुसार गठीत करावयाच्या राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी खालील प्रवर्गातून एकुण १३ जागांसाठी व्यक्ती व संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | पदांची संख्या |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| २. | नाशिक विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| ३. | नागपूर विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| ४. | पुणे विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| ५. | कोकण विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| ६. | अमरावती विभागातील ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| ७. | ग्राहक हिताशी संबंधीत प्रतिनिधी | ४ |
| ८. | शेतकरी प्रतिनिधी | १ |
| ९. | व्यापार क्षेत्रातील प्रतिनिधी | १ |
| १०. | उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी | १ |
| | एकूण | १३ |

दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ मध्ये अशासकीय सदस्यांच्या **पात्रतेचे निकष** विहित करण्यात आलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत:-

**(अ) ग्राहक संघटनांचे /संस्थांचे प्रतिनिधी :-**

(१) या प्रतिनिधींच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी संस्थेने ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे प्रशंसनीय काम केलेले असावे व संस्था लौकिकवान (Reputed) असावी.

(२) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

(३) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

(४) संस्था जात, धर्म, वंश किंवा रंग असा भेदभाव न करता जनतेच्या सेवेसाठी ग्राहक चळवळीत कार्यरत असावी.

(५) ग्राहकांच्या हिताची जपवणूक करणे व जागृती निर्माण करणे हे उद्दिष्ट संस्थेच्या घटनेत स्पष्टपणे अंतर्भूत असावे.

(६) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(७) संस्थेने ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीद्वारे राज्यातील किमान दोन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात काम केलेले असावे.

(८) संस्थेने ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करुन देण्यासाठी काम केलेले असावे.

(९) संस्थेच्या प्रतिनिधीला मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(१०) संस्था राजकीय/शासकीय/सांप्रदायिक तसेच स्वामीत्व मालकीची (Proprietary) नसावी.

(११) संस्था ही नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्यरत नसावी.

(१२) संस्थेला अस्तित्वात आल्यापासून ग्राहक कल्याण कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासनाने कधीही अपात्र ठरविलेले नसावे.

(१३) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीविरुध्द गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(१४) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(१५) संस्था आणि संस्थेमार्फत प्रस्तावित केलेला प्रतिनिधी शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

(ब) **ग्राहक हिताशी संबंधित व्यक्ती** :-

(१) या व्यक्तिंच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी त्या व्यक्तिंनी ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे काम केलेले असावे (उदा. प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी, इ.) व ती **व्यक्ती लौकिकवान** (Reputed) असावी.

(२) त्या व्यक्तिने ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे काम केलेले असावे.

(३) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे त्यांनी कार्य केलेले असावे.

(४) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात राज्यातील किमान दोन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात वैयक्तिकरित्या/संघटनात्मक काम केलेले असावे.

(५) ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करुन देण्यासाठी त्यांनी काम केलेले असावे.

(६) ग्राहक संरक्षण कार्यासंबंधी यापूर्वी पुरस्कार/सन्मान मिळालेला असावा.

(७) त्या व्यक्तिस मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(८) त्या व्यक्तिला गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(९) त्या व्यक्तिने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(१०) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य पदांवरील नियुक्ती करण्याकरिता खालील नमून्यातील **(परिशिष्ट-अ)** अर्ज भरणे आवश्यक आहे.

फोटो

## परिशिष्ट – अ

### राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना-

१. संस्थेचे/अर्जदाराचे पूर्ण नाव :
२. पूर्ण पत्ता :
३. संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता :
दूरध्वनी क्रमांक :
भ्रमणध्वनी क्रमांक
ईमेल:
४. वय :
५. शैक्षणिक अर्हता :
६. व्यवसाय :
७. प्रवर्ग :
(ज्या प्रवर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा)
८. ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरुप :
९. ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र :
१०. ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी :
केव्हापासून :
केव्हापर्यंत :
११. किती ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्यात आली व कोणत्या बाबीबद्दल ?
१२. वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका काय फायदा प्रत्यक्षात झाला आहे ?
१३. वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्टपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/पारितोषिक इत्यादी
१४. आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे ?
(एका परिच्छेदात नमूद करावे)
१५. सोबत जोडलेले पुरावे/कागदपत्रे :

.................................................................................................................................

मी, श्री/श्रीमती..............................................प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी, आणखी असे मान्य करते/करतो की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ : अर्जदाराचे नाव

## परिशिष्ट- ब

राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छुक व्यक्ती/संस्थांनी खालील प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**अ) अशासकीय संस्थेकडून नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींसाठी :**

१. विहित नमुन्यातील अर्ज.

२. अर्जासोबत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

३. गैरवर्तनासंबंधी संस्थेविरुध्द/पदाधिकाऱ्या विरुध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

४. शासनाने बंदी घातलेल्या संस्था/ संघटना यांच्याशी संबंधित नसल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

५. संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र व घटनेची प्रत.

६. संस्थेचे ध्येय व उद्देश.

७. संस्थेचे बँक बॅलेन्स प्रमाणपत्र.

८. संस्थेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प.

९. संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडिटेट स्टेटमेंट.

१०. संस्थेने ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संमतीपत्र.

**ब) इतर अशासकीय सदस्यांसाठी :**

१. विहित नमुन्यातील अर्ज.

२. अर्जासोबत संबंधित व्यक्तीने ज्या प्रवर्गातील अशासकीय संस्थांच्या नियुक्तीकरिता अर्ज केला आहे, त्यासाठी विहित केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

३. गैरवर्तनासंबंधी संस्थेविरुध्द/पदाधिकाऱ्या विरुध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

**टिप** :- अर्जासोबत परिशिष्ट- ब मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक राहील. असे साक्षांकन केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे. साक्षांकित केलेल्या प्रती जोडल्या नसल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात यावा.

इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ या पत्यावर पाठवावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक-ग्राराप-२०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२, दिनांक १९.१०.२०१३ महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(स्वाती म्हसे-पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

क्रमांक : राग्राप- १०१४/प्र.क्र. ५८/ग्रासं-२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : जुलै, २०१७

प्रति,
१) जिल्हाधिकारी ( सर्व )
२) नियंत्रक शिधावाटप, मुंबई.
३) जिल्हा पुरवठा अधिकारी ( सर्व ).

**विषय :** राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची पदे भरण्यास जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ७ मधील तरतूदीनुसार गठीत करावयाच्या राज्य ग्राहक संरक्षण परिषंदेवरील अशासकीय सदस्यांच्या खालील प्रवर्गातील जागासांठी व्यक्ती / संस्थाकडून अर्ज मागविण्यासाठी आपल्या जिल्हयातील किमान एक (सर्वाधिक खपाच्या प्रतिष्ठित वृत्तपत्रात ) इंग्रजी व मराठी दैनिकात जाहिरात देण्यात यावी. जाहिरात सोबत जोडली आहे.

२. सदर जाहिरात आपल्या जिल्हयातील नामांकित वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

सहपत्र : जाहिरातीचा नमुना

(स्वाती म्हसे-पाटील)
शासनाच्या सह सचिव

**महाराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**सूचना**

या सूचनेद्वारे ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ७ मधील तरतूदीनूसार गठीत करावयाच्या राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या पदांच्या निवडीकरीता ग्राहक संघटनेकडून/संस्थेचे प्रतिनिधी या प्रवर्गातून नाशिक, नागपूर, कोकण, पुणे, अमरावती व औरंगाबाद विभागाकरीता प्रत्येकी एक पदासाठी तसेच ग्राहक हिताशी संबंधित व्यक्ती या प्रवर्गातील ४ पदांकरीता तसेच शेतकरी प्रतिनिधी, व्यापार क्षेत्रातील प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील अशासकीय सदस्य पदांवरील नियुक्ती प्रक्रिया व त्याद्वारे करण्यात येणारी निवड शासन निर्णय क्रमांक ग्राराप- १०१३/प्र.क्र. ११९/ग्रासं-२, दि. १९ ऑक्टोबर, २०१३ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या संदर्भातील सविस्तर जाहिरात www.maharashtra.gov.in व http://mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

उक्त शासन निर्णयामध्ये विहीत केलेला अर्ज संपूर्ण भरुन त्यासोबत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या सांक्षांकित प्रती जोडून सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सहसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२. या पत्यावर कार्यालयीन वेळेपुर्वी किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील या बेताने सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

मुंबई

(स्वाती म्हसे-पाटील)
सहसचिव

दिनांक : २० जुलै, २०१७

**Government of Maharashtra**
**Food, Civil Supply and Consumer Protection Department**

# NOTICE

Vide this notice, State Consumer Protection Council which is constituted under Section 7 of the Consumer Protection Act, 1986 applications are invited for post of non-official members from the category of Consumer Organizations from Nasik, Nagpur, Konkan, Pune, Amravati & Aurangabad division each and four posts from category of Consumer related Individual representatives. Similarly, one post each from category of Farmers, Trade and Industries.

Appointment procedure and appointments for the above members will be carried out as per the procedure laid down in Government Resolution No Grarap-1013/C.R. No 119/CP-2, dated 19th October, 2013. This Government Resolution is made available on Government Website viz www.maharashtra.gov.in Detailed advertisement in this respect is published on the www.maharashtra.gov.in and http://mahafood.gov.in

Complete application in prescribed form as specified in the said G.R. with duly attested copies of all the original documents as stated in Schedule-B shall be submitted to the Joint Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya Annexe, Mumbai-400 032 so as to reach the same in office hours on or before 30 days from the publication of the said advertisement. Please note that applications received after specified time limit will not be considered.

Mumbai

Date:20th July, 2017

(Swati Mhase-Patil)
Joint Secretary to Government of Maharashtra